# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५
E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ 2012 /२०२५

दि. २५/११/२०२५
27-11-2025

## परिपत्रक

**विषय: महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

संदर्भ: १) विद्यापीठाचे पत्र क्रमांक गोंवि/म.वि.वि.वि./२९१४, दि. २५/०७/२०२२.
२) विद्यापीठाचे पत्र क्रमांक गोंवि/म.वि.वि.वि./७०५, दि. २६/०५/२०२३.
३) श्री. सुधाकर अडबाले, मा. आमदार, विधान परिषद सदस्य, नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ यांचेशी झालेल्या बैठकीमधील विषय क्रमांक ९, दि. ०६/१०/२०२५.

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयांतील अध्यापकांचे **करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस)** बाबतची प्रकरणे महाविद्यालयांकडून विनाविलंब निकाली काढण्याबाबत संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये कळविण्यात आले होते. तथापी महाविद्यालयांतील अध्यापकांचे **करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस)** अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठामध्ये सादर करावा. जेणेकरुन विद्यापीठाकडून नियमानुसार समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोयीचे होईल.

जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित **करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस)** बाबत स्थाननिश्चिती समिती गठीत करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडून तसेच शासनाकडून कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

**(श्री. दिनेश नरोटे)**
**सहायक कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रति,**

**मा. संस्था अध्यक्ष/सचिव, प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner